# महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान,चंद्रपुर पद भरती -२०१७

**संदर्भ**-१.मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, उमेद, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांचे कार्यालयीन पत्र क्र/एमएसआरएलएम/HR/प्रक्र.४३८/२१३०/२०१७ दिनांक १३.९.२०१७

२. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, उमेद, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांचे कार्यालयीन पत्र क्र/एमएसआरएलएम/HR/प्रक्र.४३६/२१२९/२०१७ दिनांक १३.९.२०१७

ग्रामीण भागातील दारिद्रिय निर्मुलन करण्यासाठी केद्र शासनाने ग्रामीण विकास मंत्रालयाच्या माध्यमातुन व जागतिक बॅकेच्या अर्थ सहाय्याने " राष्ट्रिय ग्रामीण जीवनोन्नती अभियाना " ची सुरुवात केलेली आहे.या अभियानाच्या माध्यमातुन गरीबांचे आर्थिक व सामाजिक समावेशन करणे तसेच गरीबांनी,गरीबांसाठी व गरीबांच्या स्वयंचलीत आणि शाश्वत संस्था उभ्या करणे. हे या अभियानाचा मुख्य उद्येश आहेत.या उद्येशपुर्तीसाठी महाराष्ट्र शासनाने ग्राम विकास विभागा अंतर्गत संस्था नोंदणी अधिनियम १८६०" महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची स्थापना केलेली आहे अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, चंद्रपुर द्वारे तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष चंद्रपुर,बल्लारपुर,राजुरा,कोरपना सावली,नागभिड,भद्रावती, वरोरा, सिदेंवाही,चिमुर,ब्रम्हपुरी येथील खालील पदे कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याच्या करार तत्वावर भरावयाची आहेत. उपरोक्त शासन निर्णयातील निर्देशानुसार महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान कक्ष, चंद्रपुर खालीलप्रमाणे कंत्राटी पदे स्पर्धा परीक्षा घेवून भरावयाची आहे. प्रस्तुत पदावरील भरतीसाठी उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

**(टिप:-यापुर्वी या विभागाची जाहिरात क्रमांक जिग्राविय/चं/ज्ये.सहा/आस्था १/मराग्राजिअ/जाहिरात/५०१/ २०१७ दिनांक १.३.२०१७ नुसार online पध्दतीने पात्र परिक्षार्थी सदरच्या पदाकरीता पात्र आहेत. परंतु नविन निकषानुसार शैक्षणिक अर्हता ग्राहय धरण्यांत येईल. त्यांनी पुन्हा Online पध्दतीने अर्ज करण्याची आवश्यकता नाही.)**

| | |
|---|---|
| **ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची तारीख** | २३ /११/२०१७ |
| **ऑनलाईन अर्ज भरण्याची शेवटची तारीख** | ०७/१२/२०१७ |
| **संगणकीय चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेमधे परिक्षा शुल्क स्विकृतीचा कालावधी** | ०८/१२/२०१७ |
| **परीक्षेचे प्रवेशपत्र डाउनलोड करण्याची तारीख** | संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल. www.maharecruitment.mahaonline.gov.in |
| **लेखी परिक्षा** | संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल. www.maharecruitment.mahaonline.gov.in |
| **हेल्पलाईन क्रमांक** | ०२२ ६१३१६४०३ mr.support@mahaonline.gov.in<br>Suvidha.mahaonline.gov.in |

## २.उपलब्ध पदसंख्या - आरक्षणानुसार भरावयाच्या पदाचा तपशिल पदनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| अ क्र | पदाचे नाव | भरावयाची एकुण पदे | प्रवर्ग निहाय भरावयाची एकूण पदे | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ. जा. १३% | अ.ज १५% | विजअ ३% | भजब २.५% | भजक ३.५% | भज ड २% | विजभज एकुण ११% | विमाप्र २% | इमाव ११% | खुला ४८% | अपंग |
| १ | प्रशासन व लेखा सहाय्यक(Admin& Account Asst.) | ११ | १ महिला | १ महिला | १ | १ | - | - | - | - | २ पैकी १ महिला राखीव | ५ पैकी महिला-२, माजी सैनिक-१, अंशकालीन पदवीधर-१ सर्वसाधारण -१ | - |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | डेटा एन्ट्री ऑपरेटर Data Entry Operator | ११ | १ महिला | १ महिला | १ | १ | - | - | - | - | २ पैकी १ महिला राखीव | ५ पैकी महिला-२, माजी सैनिक-१, अंशकालीन पदवीधर-१ सर्वसाधारण-१ | - |
| ३ | क्लस्टर को-ऑर्डीनेटर Cluster co-ordinator | ४१ | ३ पैकी महिला १ माजी सैनिक १ | ८ महिला ३ माजी सैनिक १ अंश-कालीन पदवीधर १ सर्व साधारण -३ | १ महिला | १ | २ पैकी महिला - १ | १ | ५ | ० | ३ महिला १ सर्व साधारण -२ | २२ पैकी महिला- ८ माजीसैनिक- ३ अंशकालीन पदवीधर -२ प्रकल्पग्रस्त - १ खेळाडु -१ सर्वसाधारण -७ | २ |
| ४ | शिपाई (Peon) | ११ | १ महिला राखीव | १ महिला राखीव | १ | १ | - | - | - | - | २ पैकी १ महिला राखीव | ५ पैकी महिला- २, माजी सैनिक- १, अंशकालीन पदवीधर- १ सर्वसाधारण -१ | - |

**टिप:-** १. वरील एकुण ४१ क्लटर कोऑडिनेटर पदामधुन गुणवत्तेणुसार प्राप्त अंपग प्रवर्गातील उमेदवाराची निवड करुन ते ज्या प्रवर्गाचे असतील त्या प्रवर्गात त्यांना नियुक्ती आदेश देण्यात येईल.

२. विजभज प्रवर्गात यापुर्वीच जाहिरात दिली असुन गुणवत्तेणुसार ज्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध होतील त्या प्रवर्गातुन त्यास नियुक्ती आदेश देण्यात येईल व त्या नुसार विजभज ची पदे भरण्यात येतील.

**पदाकरिता आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता**

१. **प्रशासन व लेखा सहाय्यक (Admin & Account Asst.)** - वाणीज्य शाखेतील पदवी/ मराठी टायपींग ३० wpm, इंग्रजी टायपींग, ४० wpm, परीक्षा उत्तीर्ण MSCIT व समकक्ष परिक्षा उत्तीर्ण आवश्यक तसेच किमान ३ वर्ष पदवीची परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर किमान ३ वर्ष प्रशासकीय व लेखाविषयक कामाचा अनुभव. **मानधन-१५,०००/-**

२. **डेटा एन्ट्री ऑपरेटर Data Entry Operator**- माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण इंग्रजी टायपींग, ४० wpm,मराठी टायपींग, ३० wpm,, MSCIT व समकक्ष परीक्षा उत्तीर्ण आवश्यक,माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर किमान ३ वर्षाचा डेटा एन्ट्री ऑपरेटर (संगणक परिचालन) कामाचा अनुभव. **मानधन-१०,०००/-**

३. **क्लस्टर को-ऑर्डीनेटर Cluster co-ordinator**- कोणत्याही शाखेचा पदवीधर व BSW OR Bsc Agriculture OR MSW OR MBA OR PG in Rural Development OR PG in Rural management Degree यास प्राधान्य देण्यात येईल तसेच ग्रामीण भागातील सामाजिक समावेशन संस्थीय बांधणी या कामाचा पदवीची परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर किमान ३ वर्ष कामाचा अनुभव, परीक्षा उत्तीर्ण **मानधन-२०५००/-**

४ .**शिपाई (Peon)** -SSC परीक्षा उत्तीर्ण , SSC परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर किमान ३ वर्षाचा शासकीय /संस्था मधील कामाचा अनुभव.**मानधन-रु. ८०००/-**

**३. प्रश्नपत्रिका व प्रश्नपत्रिकेचे स्वरुप खालीलप्रमाणे राहील.**

१. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, उमेद, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांचे कार्यालयीन पत्र क्र/एमएसआरएलएम/HR/प्रक्र.४३८/२१३०/२०१७ दिनांक १३.९.२०१७

२.मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, उमेद, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांचे कार्यालयीन पत्र क्र/एमएसआरएलएम/HR/प्रक्र.४३६/२१२९/२०१७ दिनांक १३.९.२०१७

| अ. क्र. | संवर्ग | प्रश्नपत्रिकेचा दर्जा | मराठी | | इंग्रजी | | सामान्य ज्ञान संबंधित प्रश्न | | बौध्दीक चाचणी | | महाराष्ट्र राज्य ग्रामीण जी. अभियान | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण |
| १ | प्रशासन व लेखा सहाय्यक (Admin & Account Asst.) | पदवी दर्जाची प्रश्न | २० | २० | २० | २० | २० | २० | २० | २० | २० | २० | १०० | १०० |
| २ | डेटा एन्ट्री ऑपरेटर Data Entry Operator | माध्यमिक शालांत दर्जाचे प्रश्न व संगणक ज्ञान | २० | २० | २० | २० | २० | २० | २० | २० | २० | २० | १०० | १०० |
| ३ | क्लस्टर को-ऑर्डीनेटर Cluster co-ordinator | कोणत्याही पदवी दर्जाचे प्रश्न. | मराठी | | इंग्रजी | | सामान्य ज्ञान संबंधित प्रश्न | | बौध्दीक चाचणी व सामाजिक शास्त्रे | | महाराष्ट्र राज्य ग्रामीण जी. अभियान | | | |
| | | | १४ | १४ | १४ | १४ | १४ | १४ | २८ | २८ | १० | १० | ८० | ८० |
| ४ | शिपाई (Peon) | इयत्ता १० दर्जा | २० | २० | २० | २० | २० | २० | २० | २० | २० | २० | १०० | १०० |

टिप - क्लस्टर को-ऑर्डीनेटर या पदाकरिता ८० गुणांची लेखी परिक्षा व २० गुणांची मुलाखत घेण्यात येणार आहे.

१. **पात्रतेविषयी अटी**

१. भारतीय नागरिकत्व व महाराष्ट्रातील रहिवासी असावा

२. वयोमर्यादा दि.१ /११/२०१७ रोजी किमान १८ वर्ष असावे व ३८ वर्षापेक्षा (मागासवर्गीय करिता ४३ वर्षापेक्षा) जास्त नसावे.

३. महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांकरिता ५ वर्ष शिथिलक्षम राहील.

४. माजी सैनिकासाठी उच्च वयोमर्यादा शासकीय आदेशानुसार शिथिलक्षम राहील.

५. नि:समर्थ असलेली व्यक्ती (Persons with Disabilities)प्रकल्पग्रस्त,भुकंपग्रस्त उमेदवाराकरिता ४५ वर्षापर्यंत.

६. पदवीधर अंशकालीन बेरोजगार कर्मचारी (गट क) पदाकरिता ४६ वर्षापर्यंत

**५ परीक्षा शुल्क :-शासननिर्णय साप्रवि दि. ११ मार्च २०१५ अन्वये**

१. प्रस्तुत भरती प्रक्रियेसाठी खालीलप्रमाणे परीक्षा शुल्क राहील.

| मागासवर्गीय उमेदवाराकरिता | खुल्या प्रवर्गातील उमेदवाराकरिता |
|---|---|
| रु. १५०/- | रु.३००/- |

वरीलप्रमाणे परीक्षा शुल्क हे नापरतावा राहील. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणारे उमेदवारांनी त्यांचे परीक्षा शुल्क कार्यालयाने निश्चित केलेल्या Website वर दिलेल्या सुचनेनुसार भरण्यात यावे. उमेदवाराने Net Banking/ Debit Card/ Credit Card या चलानाची प्रत देउन स्टेट बॅक ऑफ इंडिया च्या कोणत्याही शाखेत बॅकेच्या कार्यालयीन वेळेत भरण्यात यावी तसेच शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणाऱ्या उमेदवाराने त्या पुढील कामकाजाच्या दिवशी बॅंकेच्या कार्यालयीने वेळेत परिक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**टिप :-**१. माजी सैनिक उमेदवारांना आवेदन शुल्क भरण्याची आवश्यकता नाही परंतु Mahaonline Limited चे सेवाशुल्क भरणे अनिवार्य राहील. अर्जात माजी सैनिक असा उल्लेख असणे आवश्यक आहे

कागदपत्रे तपासणीचे वेळी उमेदवार, माजी सैनिक नसल्याचे आढळून आल्यास अर्ज रदद करण्यात येउन फौजदारी स्वरुपाचा गुन्हा नोंदविण्यात येईल.

२. विमुक्त जाती भटक्या जमाती विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील जे उमेदवार उन्नत व प्रगत गटात (क्रीमीलेअर) मोडतात त्यांना आरक्षणाचा व वयोमयोचा फायदा मिळत नसल्याने त्यांनी खुल्या उमेदवाराप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

३. खुला महिलासाठी आरक्षित असलेल्या पदाकरिता अर्ज करणाऱ्या जाती, भटक्या जमाती, विशेष मागास वर्ग, इतर मागास वर्ग मधील महिला उमेदवारांपैकी जे उमेदवार उन्नत व प्रगत गटात (क्रीमीलेअर) मोडतात त्यांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा मिळत नसल्याने त्यांनी खुल्या उमेदवाराप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

६ अर्ज करण्याची पध्दत :-

१. अर्ज सादर करतांना दिलेल्या Website (Mahaonline) वरील सुचनांचे काटेकोर पालन करुन अर्ज सादर करावा.

२. प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त Online पध्दतीने स्विकारण्यात येईल इतर कोणत्याही पध्दतीने अर्ज स्विकारण्यात येणार नाही.

३. पात्र उमेदवाराला ऑनलाईन अर्ज maharecruitment.mahaonline.gov.in या वेबसाईटद्धारे दिनांक ०७ / १२ / २०१७ सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत सादर करणे आवश्यक राहील.

४. ऑनलाईन पध्दतीने अर्ज करतांना उमेदवाराने स्वत:चा अद्यावत फोटो (३.५ सेमी X ४.५ सेमी) व स्वत:ची स्वाक्षरी (रुंदी ३ सेमी X २.५) आणि ३०० DP Resolution आणि ५० K.b. पेक्षा कमी साईज होईल अशा विहीत पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे. (टिप - फोटो व स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवाराने त्याचाच फोटो व स्वाक्षरी अपलोड झाल्याचे खात्री करावे. प्रवेश पत्रावर/अर्जावर दुसऱ्याचा फोटो/स्वाक्षरी असल्यास उमेदवारास निवडीच्या टप्प्यामध्ये प्रवेश दिल्या जाणार नाही)

५. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सुचना **maharecruitment.mahaonline.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे

६. अर्ज ऑनलाईन अथवा महा-ई सेवा केंद्राद्वारे भरता येते. Mahaonline Limited या संस्थेकडून प्रत्येक जिल्हयात महा-ई-सेवा केंद्र उघडण्यात आले आहे या महा ई सेवा केंद्राची यादी www. maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

७. उमेदवाराने या पुर्वी www.maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर आपले खाते तयार केलेल नसल्यास उमेदवारास नविन वापरकर्ता नोंदणीवर क्लिक करुन Username व Password तयार करावा लागेल.

८. त्यांनतर उमेदवारास प्रोफाईल निर्मिती मध्ये जाउन स्वत:ची सर्व माहिती भरावी लागेल. www.maharecruitment.mahaonline.gov.in या वेबसाईट वर या पूर्वी प्रोफाईल मधील निर्मिती मध्ये जाउन स्वत:ची संपूर्ण माहिती भरलेली असल्यास पुन्हा माहिती भरण्याची आवश्यकता नाही.उमेदवार स्वत:ची प्रोफाईल मधील माहिती कधीही अदयावत करु शकतो.

९. उमेदवाराने युजर नेम व पासवर्ड ची नोंद लॉग इन केल्यानंतर अर्ज सादर करावयाचा कार्यालयाच्या लिंकवर क्लिक करावे. त्या कार्यालया अंतर्गत उपलब्ध जाहिराती अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा या संदेशासह दाखविला जातील.

१०. क्लिक केल्यानंतर आपण जाहिरातीत नमुद शैक्षणिक पात्रता/अनुभव/इतर बाबींची पुर्तता करीत असल्यास आपले अर्ज स्विकारल्या जातील. अन्यथा अर्ज दाखल न होण्याचे कारण दाखवले जातील.

११. परिक्षा प्रवेशपत्र उमेदवारांस www.maharecruitment.mahaonline.gov.in या वेबसाईट वर उपलब्ध करुन देण्यांत येणार आहे.पदभरती संदर्भात सविस्तर माहिती, इतर शर्ती व अटी या www.maharecruitment.mahaonline.gov.in या वेबसाईट वर प्रसिध्द करण्यांत आलेली संपुर्ण जाहिरातीमधील सुचनाचे वाचन करुनच अर्ज सादर करावा.

१२. परिक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय परिक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**७. नॉनक्रिमीलिअर प्रमाणपत्र नजीकच्या काळात काढलेले असावे.** (विमुक्त जाती व भटक्या जमाती /विशेष मागास प्रवर्ग /इतर मागास प्रवर्ग करीता आवश्यक ) सदर प्रमाणपत्र दिनांक

ऑक्टोंबर २०१७ च्या आर्थिक वर्षापर्यंत वैद्य असणे आवश्यक आहे. वैद्य प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवाराचा विचार केला जाणार नाही. व अशा उमेदवारांना राखीव संवर्गाचा लाभ घेता येणार नाही. जर उमेदवारांने खुल्या प्रवर्गाचे परिक्षा शुल्क भरले असेल तर त्यांचा अर्ज खुल्या प्रवर्गासाठी ग्राहय धरण्यांत येईल.

८.अनुभव प्रमाणपत्र (मोघम नको) संस्थेचा शिक्का व सही तसेच जावक क्रमांक असणे आवश्यक आहे.

९. शासकीय/निमशासकीय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजुरी घेतल्याची प्रमाणपत्र आवश्यक राहील.अर्जात विभागप्रमुख्रांनी दिलेल्या परवानगीचा क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे.

१०.उमेदवार हा महाराष्ट्रातील मुळ रहिवासी असावा.उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे डोमेसियल प्रमाणपत्र प्राधिकृत अधिकाऱ्यांकडुन घेतलेले असावेत. डोमेसियल प्रमाणपत्र नसल्यास महाराष्ट्रातील जन्माचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील.

११.विमुक्त जाती/भटक्या जमाती/विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गाला उन्नत व प्रगत गटाची (क्रिमिलिअर) बाबत सामाजिक न्याय विभागाने वेळोवळी निश्चित केलेले नियम व अटी लागु राहतील.

१२.निवड प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर ६० दिवसाचे कालावधीनंतर प्रश्नपत्रिका व उत्तर पत्रिका नष्ट केल्या जातील.

१३. ऑनलाईन फॉर्म भरण्याचा शेवटच्या दिवशी दिनांक ७ /१२/२०१७राहील. दिलेल्या तारखेनंतर संकेतस्थळावरुन अर्ज भरण्याची प्रक्रिया काढुन टाण्यांत येईल/ बंद करण्यांत येईल अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्विकारले जातील.कार्यालयात प्रत्यक्ष स्वरुपात कोणतेही अर्ज स्विकारण्यांत येणार नाही.

१४. प्रस्तुत भरती प्रक्रियेच्या वेळोवेळी शासनाकडुन प्राप्त होणाऱ्या सुचनेप्रमाणे कार्यवाही करण्यांत येईल.तसेच सदरहु प्रक्रियेत काही बाबी नमुद करावयाच्या राहील्यास किंवा अनावधानाने चुकीच्या नमुद केलेल्या असल्यास त्या प्रचलित शासन निर्देशानुसार/निर्णयानुसार लागु राहील.

१५. अर्ज भरण्यासंबंधी हॉलतिकिट (परिक्षा प्रवेशपत्र) उपलब्धतेसाठी इत्यादी तत्सम बाबींसाठी वरील संकेत स्थळा वर संपर्क करावा.

१६. निवड झालेल्या उमेदवारांना पदस्थापना चंद्रपुर,बल्लारपुर,राजुरा,कोरपना,सावली, नागभिड, भद्रावती, वरोरा,सिदेंवाही,चिमुर,ब्रम्हपुरी येथे देण्यांत येईल. निवड झालेल्या उमेदवारांनी पदस्थापनेबाबत /स्थळाबाबत कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा पदस्थापनेबाबत विनंती केल्यास त्यांची निवड रद्य करण्यांत येईल याची नोंद घेण्यांत यावी.

१७. उमेदवारांस मराठी ज्ञान असणे आवश्यक आहे.

१८. वेगवेगळ्या पदासाठी वेगवेगळा अर्ज करावा लागेल.परंतु एकाच वेळस वेगवेगळ्या पदाची परिक्षा आली तर एकाच पदाच्या परिक्षेसाठी उमेदवाराला स्वेच्छेने बसता येईल.

१९. उमेदवाराने यापुर्वी जरी त्यांचे नांव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे (सेवायोजन कार्यालयाकडे /एकात्मीक आदिवासी प्रकल्प कार्यालय/जिल्हा सैनिक कार्यालय व जिल्हा पुनर्वसन येथे नोंदवले असेल तरी त्यांना यापदाच्या भरतीसाठी ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक आहे.)

२०. एखादया उमेदरवाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

२१. उमेदवाराची निवड लिखीत परिक्षेच्या गुणाच्या आधारे गुणानुक्रमे तयार केलेल्या यादीनुसार करण्यात येईल. पदाची उपलब्ध संख्या समांतर आरक्षण विचारात घेता समान गुण धारण करणाऱ्या उमेदवाराच्या निवडीबाबत शासन निर्णय दिनांक ५.१०.२०१५ मध्ये दिलेल्या सुचनांच्या अधिन राहुन निवड केल्या जाईल.

२२. कोणत्याही कारणास्तव रिक्त पदाच्यासंख्येत बदल अथवा भरती रद्द झाल्यास याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदाची संख्या, समांतर आरक्षणाबाबत बदल करणे, परिक्षा स्थगीत करणे व रदद करणे, अंशत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार जिल्हा निवड समिती चंद्रपूर यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहे. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

२३. या जाहिरातीतील नमुद केलेल्या पदावर उमेदवाराची निवड न्यायालयीन निर्णय शासनाच्या विविध विभागाचे शासन निर्णय व परिपत्रके यातील निर्देशाच्या आधीन असेल.

२४. भरती प्रक्रियेसंबंधी देण्यात आलेल्या सुधारीत व अदयावत सुचना कार्यालयीन फलकावर तसेच maharecruitment.mahaonline.gov.in या वेबसाईट वर प्रसिध्द करण्यांत येईल.

२५. महाराष्ट्र राज्य लोकसेवा निरधीसुचित जमाती (विमुक्त जाती) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग यांचेसाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक) हा अधिनियमातील नियम क्र. ४ (२) खालील पदान्वये उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याने (नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र) सादर करणे आवश्यक आहे तसेच महिलांच्या आरक्षणाबाबत शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग क्र. ८३ /२००१/मसेआ-००/प्रक्र-४१५/का-२ दि. २५ मे २००१ मधील ततुदीनुसार महिलाकरिता राखीव

असलेल्या पदाचा फायदा घ्यावयाचा आहे त्या महिला उमेदवाराकडे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

२६. नैसर्गिक आपत्तीमुळे अथवा अन्य कारणास्तव विहीत दिनांकास लेखी परिक्षा घेणे शक्य नसेल तर शासन ठरवून देईल त्याचप्रमाणे सोयीचे दिवशी लेखी परिक्षा घेण्यात येईल. याबाबतीत सर्व उमेदवारांना वर्तमान पत्रातून जाहिरातीद्धारे व जिल्हा परिषदेच्या संकेत स्थळावरुन कळविण्यात येईल.

२७. जाहिराती मधील काही बाबीविषयी शंका असल्यास त्यांनी संबंधित खाते प्रमुख महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, चंद्रपूर यांना कार्यालयीने वेळेत समक्ष भेटावे. अथवा www.umed.in या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

२८. उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता, पात्रता वर्गवारी इत्यादी तपासुन अर्ज करावा.

२९.परिक्षेच्या दुसऱ्या दिवशी संवर्गनिहाय उत्तरतालिका जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष चंद्रपूर च्या नोटीस बोर्डवर आणि संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

३०. उत्तरतालिका प्रसिध्द केल्यानंतर त्यावर काही आक्षेप असल्यास ३ दिवसाचे आत लेखी आक्षेप पुराव्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा अभियान संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा अभियान, व्यवस्थापन कक्ष, चंद्रपूर यांचे कार्यालयात सादर करावे.

३१. कोणताही अर्ज करणारा उमेदवार विहीत शैक्षणिक अर्हता,पात्रता धारण करित नसल्याचे किंवा त्यांचे चारित्र्य किंवा पूर्व चारित्र्य बरोबर नसल्याचे आढळल्यास त्यांची उमेदवारी नियुक्ती कोणत्याही टप्यावर रद्द करण्यात येईल.

३२. उमेदवारांनी जाहिराती मध्ये नमुद केलेल्या पात्रता व अटी शर्ती नुसार पात्र असे समजुन लेखी परिक्षेकरीता तात्पुरता प्रवेश देण्यात येईल. नियुक्ती पूर्वी उमेदवाराची जाहिरातीनुसार पात्रता तपासण्यात येईल. त्यावेळी उमेदवार अपात्र आढळल्यास नियुक्ती करण्यात येणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच जाहिराती मधील समांतर आरक्षणाची पदे उपलब्ध न झाल्यास खुल्या प्रवर्गातुन सदरची पदे भरण्यांत येतील.

स्वा-

**मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. तथा**
**जिल्हा अभियान संचालक म. रा.ग्रा. जी.अ.**
**चंद्रपूर**